प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

ऑगस्ट 11, 2017

**चलनी नोटा छापण्यातील दर्जा नियंत्रण उपायांवर आरबीआयचे स्पष्टीकरण**

भारतीय बँक नोटा निर्माण करण्यासाठी अनुसरण्यात येणा-या प्रक्रिया व रीत ही, जगभरात अनुसरण्यात येणा-या सर्वोत्कृष्ट रीतींप्रमाणेच आहे. ह्या रीतींना धरुनच, ह्या बँक नोटांचा दर्जा, आकार, डिझाईनची नेमकी जागा, छपाईची लक्षणे इत्यादींच्या निरनिराळ्या टॉलरन्स पॅरामीटर्समध्येच ठेवली जाते. चलनी नोटा छापण्याची यंत्रसामुग्री, अत्याधुनिक यंत्रे, डॉक्युमेंटेड प्रणाली व तंत्रज्ञानयुक्त कर्मचारी ह्यांनी युक्त असल्याने, नोटांच्या निर्मितीच्या प्रत्येक टप्प्यावर, खात्रीलायक दर्जा नियंत्रण ठेवले जाते. प्रत्येक/एकेका नोटेची तपासणी करण्यासाठी वेगवान इंटिग्रेटेड सिस्टिम्स ठेवण्यात आल्या आहेत. ह्या प्रणाली, नोटांमधील सुरक्षा लक्षणे व छपाईच्या दर्जाची वैधता करतात. अत्यंत कडक अशा दर्जा-नियंत्रण कार्यरीतींमध्ये, अंतिम उत्पादाच्या दर्जाची तपासणी करण्यासाठी असलेल्या निरनिराळ्या ऑन लाईन व ऑफ लाईन प्रणाली समाविष्ट आहेत. गुणविशेषांबाबतच्या निकषांचे सत्यांकन करण्यासाठी, खास कागद व शाई ह्यांचे परीक्षण करणा-या प्रयोगशाळाही ह्या छापखान्यामध्ये उपलब्ध आहेत.

नोटेमधील विशिष्ट लक्षणासाठी (उदा. सुरक्षा धाग्याची रुंदी, वॉटरमार्कचे व सुरक्षा धाग्याचे लॉडरिंग व कापण्यामधील काटेकोरपणा) प्रमाणभूत अशा टॉलरन्स मर्यादा विहित करण्यात आल्या आहेत. स्वीकार्य अशा टॉलरन्स स्तरा पलिकडे असलेली लक्षणे असलेल्या नोटांबाबत, जनतेकडून आरबीआयकडे क्वचितच तक्रारी आल्या आहेत. अशा क्वचितच निर्माण झालेल्या बाबतीत एक प्रमाणभूत कार्यकारी कार्यरीत ठेवण्यात आली असून, त्यात अशी प्रत्येक नोट तपासली जाते व त्रुटी सुधारण्याचे उपाय केले जातात.

**जोस जे कत्तूर**

**वृत्तपत्र निवेदन : 2017-2018/433**

मुख्य महाव्यवस्थापक